लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !

# करोनाकाळात ६० टक्के मुंबईकर मानसिक ताणतणावात

‘टाळेबंदीमुळे आर्थिक फटका तर बसलाच, मानसिक आरोग्याच्या समस्याही निर्माण झाल्या.

लोकसत्ता टीम | January 29, 2021 12:11 am



**टाळेबंदी, आजाराबाबत भीती, आर्थिक अडचणी आदी कारणे; ८४ टक्के जणांचा मात्र मदत घेण्यास नकार**

मुंबई : करोनामुळे अचानक लागू झालेली टाळेबंदी, आजाराबाबतची भीती, आर्थिक अडचणी अशा विविध बाबींमुळे ६० टक्के मुंबईकरांना मानसिक ताणतणाव, नैराश्याला तोंड द्यावे लागल्याचे 'प्रजा फाउंडेशन'च्या अहवालातून निदर्शनास आले आहे. मात्र यातील ८४ टक्के नागरिकांनी यातून बाहेर पडण्यासाठी कोणीतीही मदत न घेतल्याचे वास्तवही या अहवालातून समोर आले आहे. टाळेबंदीतील आरोग्य समस्या जाणून घेण्यासाठी प्रजाने मुंबईतील ७६९ नागरिकांचे सर्वेक्षण केले होते.

टाळेबंदीच्या काळात अचानकपणे घडलेल्या काही गोष्टी, दैनंदिन आयुष्यात आलेली अनेक बंधने, आजाराचे भय अशा अनेक स्तरांवर झगडताना चिंता, ताण वाढल्याचे अनुभव ६० टक्के मुंबईकरांनी व्यक्त केले. परंतु यातील ८४ टक्के जणांनी यातून बाहेर पडण्यासाठी कोणाचीही मदत घेतली नाही, असेही मत मांडले आहे. मानसिक ताणतणावाचा त्रास झालेल्या केवळ ४ टक्के नागरिकांनी मानसोपचारतज्ज्ञांची मदत घेतली. यात ९० टक्के सामाजिक-आर्थिकदृष्ट्या उच्च स्तरातील होते, तर दुर्बल स्तरातील केवळ १ टक्के नागरिकांचा समावेश होता. यातील ८३ टक्के नागरिकांनी हे गंभीर नसल्याचे नमूद करत मदत घेतली नाही, असे सांगितले. तर ७ टक्के नागरिकांना तणावातून बाहेर पडण्यासाठी मदत घेणे गैरसोयीचे वाटते, तर ५ टक्के नागरिकांना अविश्वासार्ह वाटत असल्याचे अहवालात म्हटले आहे.

'टाळेबंदीमुळे आर्थिक फटका तर बसलाच, मानसिक आरोग्याच्या समस्याही निर्माण झाल्या. अलगीकरणामुळे आलेला शारीरिक व मानसिक ताण आणि काम सुटणे, पगार न मिळणे, स्व-विलगीकरण इत्यादींमुळे मानसिक स्वास्थ्य खालावल्याचे दिसून येते. या परिस्थितीमुळे मानसिक आरोग्याचा मुद्दा समोर ठाकला. मानसिक आरोग्याविषयी अधिक जाणीवजागृतीची आणि सुधारणेची गरज असल्याचे लक्षात येते', असे प्रजाचे संस्थापक निताई मेहता यांनी सांगितले.

**ऑनलाइन शिक्षणाचे बालकांवर दुष्परिणाम**

ऑनलाइन शिक्षणाच्या नकारात्मक बाजूही अहवालातून मांडल्या असून शारीरिक हालचाली नसल्याने मुलांच्या प्रकृतीवर प्रतिकूल परिणाम झाला असल्याचे ६३ टक्के पालकांनी नोंदविल्या आहेत. यात डोळ्याच्या समस्या (४३%), चिडचिडेपणा (६५%) तर मित्रांशी भेटता येत नसल्याने अस्वस्थ झाल्याचे ७४ टक्के पालकांनी नमूद केले आहे. त्यामुळे बहुसंख्य पालकांनी (६२%) ऑनलाइन शिक्षण थांबवून प्रत्यक्ष शाळा सुरू करावी असे म्हटले, आता मुलांना शाळेत पाठविण्यासाठी परिस्थिती सुरक्षित असल्याचे ५४ टक्के पालकांनी व्यक्त केल्याची माहिती संस्थेचे संचालक मिलिंद म्हस्के यांनी दिली.

**करोना उपचाराचा सर्वाधिक भार पालिका रुग्णालयांवर**

करोनाचे उपचार घेण्यासाठी पालिकेची सार्वजनिक आरोग्य रुग्णालयांना प्राधान्य दिल्याचे ७३ टक्के मुंबईकरांनी व्यक्त केले. सर्वेक्षणातील २ टक्के करोनाबाधित होते. यातील ३९ टक्के रुग्णांनी मोफत उपचार घेतले. ६१ जणांनी उपचारासाठी खर्च केला असला तरी यातील ५० टक्के रुग्णांना १० हजारांहून कमी आर्थिक भार झेलावा लागला. पालिका रुग्णालयात उपचार घेतलेल्यांपैकी जवळपास २७ टक्के रुग्णांनी सेवा चांगल्या दर्जाची असल्याचे मत मांडले आहे.

**खासगी रुग्णालयांना प्राधान्य**

टाळेबंदीत करोनाव्यतिरिक्त इतर आजारांच्या सेवा मिळण्यात ३६ टक्के मुंबईकरांना अडचणी आल्या असून यातील ५० टक्के नागरिकांनी खासगी दवाखाने आणि रुग्णालये बंद असणे, डॉक्टर उपलब्ध नसल्याचे कारण नमूद केले आहे. करोनाव्यतिरिक्त इतर आजारांच्या रुग्णांसाठी ५८ टक्के नागरिकांनी खासगी रुग्णालयांना प्राधान्य दिले आहे. .

Link:- https://www.loksatta.com/mumbai-news/corona-virus-mumbaikar-in-mental-stress-akp-94-2389681/